भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १८१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०४/२०१८

**१) हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०६/०४/२०१८ चे १५.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी हिचे लग्न आरोपी क्र. १ सोबत जोडले असता, यातील आरोपीतांनी संगनमत करून लग्ना करीता १,५०,०००/रु. ,सोन्याचा गोप, मोटार सायकल हे हुंडयात दयावी, अशी हुंडयाची मागणी करून न दिल्यास लग्न करण्यास नकार दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४ हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी :–**

दिंनाक ०८/०४/२०१८ चे १०.०० ते ०४.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचे घराचा मागील दरवाज्याचा कोंडा काढुन आत प्रवेश करून गोदरेज आलमारीतील स्टिल डब्यामध्ये ठेवलेले दोन नग सोन्याची गहु मनीपोत वजन २० ग्रॅम कि. ३०,०००/रु., दोन नग सोन्याची पांचाली ०८ ग्रॅम कि. १२,०००/रु., दोन नग सोन्याचे स्टॉप्स वजन ०३ ग्रॅम कि. ५,०००/रु., दोन जोड चांदीचे पायल कि. १,०००/रु व नगदी १५,०००/रु. असा एकुन ६३,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी दिंगाबर बोरकर वय ४२ वर्ष रा. शेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) रेतीची चोरी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०१/०४/२०१८ चे ०७.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी यांचे शेतात रेती चोरी करून ट्रॅक्टर द्वारे उपसा करून फिर्यादीचे शेतात एकुण ४ ब्रॉस रेतीचा साठा करून कि. १२,०००/रु. ची रेती चोरी केल्याने फिर्यादी कुंडलीक देवाजी लाडे वय ७२ वर्ष रा. बारव्हा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोहवा. मांढरे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) गैरकायदयाची मंडळी जमवुन जागेच्या वादावरून भांडण करून काठीने मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०८/०४/२०१८ चे ११.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे अंगणात प्रवेश करून तिचे वाडीतील झाडे तोडुन कुंर्पिन उपडुन फेकुन ही जागा आमची आहे. असे बोलुन फिर्यादी व तीचे मुलासोबत भांडण शिवीगाळ करून फिर्यादीचे डावे हातावर, खादयावर, काठीने मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १४३,१४७,४४७,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) संगनमत करून काठीने व कुऱ्हाडीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०८/०४/२०१८ चे १०.३० वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे पत्नीचे नावाने असलेल्या घराचे येण्या–जाण्याचे रस्त्यावर लाकुड, रेतीने भरलेल्या बो–या टाकुन फिर्यादीला घरामध्ये जाण्यास अडथळा निर्माण केल्याने, फिर्यादीने आरोपीस हटकले असता आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी व फिर्यादीची पत्नी सौ. कुंतन व भांडण सोडविण्यास धावणा–या ईतर २ महिलांना काठीने व कुऱ्हाराडीने मारपीट करून जखमी केल्याने फिर्यादी आत्माराम रामलाल पटले वय ६२ वर्ष रा. समर्थ नगर लाखनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४१,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**६) ओ.पी. पॉयझनींग औषध प्राशन करून इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक ०७/०४/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील मृतक मधुकर श्रावण बोपचे वय ५२ वर्ष रा. केसलवाडा/पवार हा दि. २९/०३/२०१८ ला १४.३० वा. दरम्यान ओ.पी. पॉयझनिंग औषध प्राशन केल्याने, त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे भरती करून आय.सी.यु. मध्ये उपचार सुरू असतांनी दि. ०७/०४/२०१८ चे १६.३० वाजता मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सरतर्फे पोशी. देवकते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी करीत आहेत

**७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:–**

दिंनाक ०८/०४/२०१८ चे १५.०५ वाजता दरम्यान यातील मृतक किरण नारायण कावळे वय ३९ वर्ष रा.देशबंधु वार्ड भंडारा याने अती जास्त प्रमाणात दारू प्राशन केल्याने त्यास सामान्य रूग्नालय भंडारा येथे दि. ०८/०४/२०१८ ला ०७.४५ वा. औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो व सरतर्फे फिर्यादी पोशी. थेर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्हाके पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत

**८) अवैध दारु/जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ०८/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर,तुमसर,पवनी व भंडारा येथे अवैध हातभट्टी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारू किंमती १६,००/–रु. तसेच १०८ लिटर बिअर +१ स्विप्ट फोरव्हीलर गाडी किमती ४,२५,९२०/रु. व जुगारातुन किमती ४४०/–रु. असा एकुन किमती ४,२७,९६०/रु.माल जप्त करण्यात आला.

**०९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०८/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १०५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.